**नोटिस**

**शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळ शिर्डी, जिल्हा अहमदनगर येथे सीटी साईड क्षेत्रामध्ये उपहारगृह / कॅन्टीन व्यवस्था सुरु करण्याबाबत**

व्यक्तिगत पात्रता निकष :-

१) सदर व्यक्तीकडे शिर्डी विमानतळामुळे प्रकल्पग्रस्त असल्याचे सक्षम शासकीय यंत्रणेने दिलेले प्रमाणपत्र असावे.

२) सदर व्यक्तीस कमीत कमी तीन वर्षांकरीता चहाचा ठेला / खानावळ / उपहारगृह चालविण्याचा अनुभव असावा अथवा सदर व्यक्तीने एखाद्या अनुभवी उपहारगृहाशी संयुक्त उपक्रम (Joint Venture) करावे.

३) सदर व्यक्तीने एक वर्षाचे बँक स्टेटमेंट सादर करावे.

४) उपरोक्त उपक्रमातून मिळालेल्या गेल्या तीन वर्षातील उत्पन्नाच्या दाखल्याच्या सनदी अधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या प्रती सादर कराव्यात.

५) शिर्डी येथील सीटी साईड क्षेत्रामध्ये तात्पुरत्या स्वरुपात उपहारागृहाकरीता सुमारे ५०० वर्ग फुट बांधकाम, त्याकरीता आवश्यक सर्व पायाभूत सुविधांसह उभारणे. ही निवड होणाऱ्या व्यक्तीची/ संस्थेची जबाबदारी असेल.

६) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या उपहारागृहाकरीता अवश्यक शासकीय परवाना / ने प्राप्त करुन घेणे ही निवड होणाऱ्या व्यक्तींची / संस्थेची जबाबदारी असेल.

७) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या उपहारगृहाकरीता भाडे करारनाम्यामधील अटी व शर्ती समजून घेऊन त्यानुसार कार्यवाही करणे ही सर्वस्वी निवड होणाऱ्या व्यक्ति / संस्थेची जबाबदारी असेल.

वर दिलेल्या व्यक्तिगत पात्रता निकषानुसार सर्व कागदपत्रे बंद लिफापामध्ये दि. १०/०१/२०१९ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या.,८वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५ या पत्त्यावर पाठवावे.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक